# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 04 November 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

निवडणूक आयोगानं राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्याचे निर्देश दिले आहेत. रश्मी शुक्ला यांच्याकडील पदभार त्यांच्यानंतरच्या ज्येष्ठता क्रमवारीतील पोलीस अधिकाऱ्याकडे सोपवण्याचे निर्देश आयोगानं मुख्य सचिवांना दिले आहेत. त्यानुसार, विवेक फणसाळकर यांच्याकडं पोलीस महासंचालकपदाचा पदभार सोपवण्यात आला आहे. तसंच तीन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची नावं निवडणूक आयोगास उद्यापर्यंत पाठवण्यास सांगितलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. बोरिवली विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणारे भाजप नेते आणि माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. बोरीवलीत भाजपने संजय उपाध्याय यांना उमेदवारी घोषित केल्यानंतर गोपाळ शेट्टी यांनी बंड करत अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला होता.

****

नांदेड विधानसभा निवडणुकीत तीन विधानसभा मतदारसंघांतून आतापर्यंत २१ अर्ज मागे घेण्यात आले. अर्ज मागे घेणाऱ्यांमध्ये एकापेक्षा अधिक अर्ज दाखल करणारे उमेदवार तसेच अपक्ष उमेदवारांचाही समावेश आहे. भोकरमध्ये सर्वाधिक १७ अपक्ष उमेदवारानी तर नायगाव आणि लोहा विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी दोन उमेदवाराने आपले अर्ज मागे घेतले आहेत.

****

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. आपल्या सर्व उमेदवारांना त्यांनी अर्ज मागे घेण्याचं आवाहन केलं आहे. मित्रपक्षांनी अर्ज पाठवले नसल्यामुळं माघार घेत असल्याचं, त्यांनी

आज सकाळी जालन्यात आंतरवाली सराटी इथं वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठीचा लढा यापुढेही सुरूच राहणार असल्याचं ते म्हणाले.

****

नागपूर इथं आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते भाजपच्या तीन निवडणूक कार्यालयांचे उद्घाटन होणार आहे. यात दक्षिण नागपूर इथं मोहन मते यांच्या, पूर्व नागपूर इथं कृष्णा खोपडे यांच्या आणि मध्य नागपूर मतदारसंघातील प्रवीण दटके यांच्या कार्यालयांचा समावेश आहे. त्यानंतर उमेदवारांसाठी गडकरी यांच्या जाहीर सभा होणार आहेत.

****

पंतप्रधान तसंच भाजपचे नेते नरेंद्र मोदी आज झारखंड इथं दोन निवडणूक प्रचारसभांना संबोधित करणार आहेत. आज सकाळी गढवा इथं त्यांनी पहिली प्रचार सभा घेतली. त्यानंतर चाईबासा इथं पंतप्रधानांची जाहीरसभा होणार असल्याची माहिती, झारखंड भाजपचे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री बाबूलाल मरांडी यांनी दिली आहे.

****

ऑस्ट्रेलियात ब्रिसबेन इथं भारताच्या पहिल्या महावाणिज्य दुतावासाचं परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांनी आज उद्घाटन केलं. भारत - ऑस्ट्रेलिया यांच्यात दीर्घकाळापासून घनिष्ठ संबंध असून, व्यापार तसंच शैक्षणिक संबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी योगदान देणार असल्याचं एस जयशंकर यांनी यावेळी बोलताना सांगितलं. बैठकीदरम्यान, दोन्ही नेत्यांनी भारत आणि क्वीन्सलँडमधील आर्थिक, व्यापार आणि गुंतवणूक सहकार्य मजबूत करण्याच्या संधी आणि मार्गांवर चर्चा केली.

****

भारतीय यष्टीरक्षक-फलंदाज रिद्धिमान साहाने क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. साहाने ४० कसोटी आणि नऊ एकदिवसीय सामने खेळले आहेत. सध्या सुरू असलेले रणजी करंडकाचे सामने हे त्याचे अंतिम सामने असल्याचं त्यानं सामाजिक माध्यमांवर जाहीर केलं आहे.

****

उत्तराखंडमधील अल्मोडा जिल्ह्यात आज एक बस खोल दरीत कोसळून २० भाविकांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. बस गढवालहून

कुमाऊंकडे जात असताना अल्मोडा इथं कुपी गावाजवळ हा अपघात झाला. बसमध्ये एकूण चाळीस प्रवासी होते. पोलीस आणि राज्य आपत्ती पोलीस दलातर्फे शोध मोहीम आणि बचाव कार्य सुरू असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला असून शासनातर्फे मृतांच्या नातेवाईकांना चार लाख रूपयांची मदत देण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

दिवाळीनंतरच्या व्यापार आठवड्याच्या पहिल्या दिवशी, दोन्ही प्रमुख शेअर बाजार निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी यांच्यात घसरण पाहायला मिळाली. बीएसई निर्देशांक 1,031 अंकांनी घसरुन 78,693 वर आला. तर एनएसई निफ्टी 328 अंकानी घसरुन 24,000 वर आला.

****

१४ व्या हॉकी इंडिया अजिंक्यपद स्पर्धांना आजपासून चेन्नईत प्रारंभ होत आहे. १६ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत ३१ संघ सहभागी होत आहेत. उपांत्य फेरीचा सामना १५ नोव्हेंबरला तर अंतिम सामना १६ नोव्हेंबरला खेळवला जाणार आहे.

****

येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात इतरत्र हवामान कोरडं राहिल.

****